# इतिहास समितीतर्फे शिर्के यांचे अभिनंदन

**कोल्हापूर :** भारतीय इतिहास संकलन समितीतर्फे शनिवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल युगयुगीन करवीर इतिहास दर्शन या ग्रंथाची प्रत देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी समितीचे अध्यक्ष वी. डी. स्वर्णे, डॉ. आरेन हर्डीकर, डॉ. केशव हरेल, उमाकांत राणिंगा, आदी उपस्थित होते.

# उशिरा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुपरलेट फी

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी मार्च आणि एप्रिल मध्ये परीक्षा न देता आलेल्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने परीक्षा देण्याची संधी दिली होती यामुळे विद्यापीठाच्या निर्णयाचे स्वागत करण्यात येत होते पण विद्यापीठाने नुकतेच नवीन परीपत्रक काढत यासाठी सुपरलेट फी भरावी लागणार आहे, असे त्यात नमूद केले आहे यामुळे विद्यार्थी संघटनेकडून या परीपत्रकाला विरोध करत आहे.

मार्च आणि एप्रिलच्या परीक्षा नुकतेच ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने झाले या परीक्षेसाठी अर्ज न केलेल्यांसाठी २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, विद्यापीठाने नवीन निर्णय घेत विद्यार्थ्यांना परीक्षेला बसण्यासाठी सुपर लेट फी द्यावी लागणार, असे स्पष्ट केले आहे.